<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. –११</u>

<u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u>
सरकार विरुध्द
निशाणी – ७८

मी शपथपूर्वक खरे सांगतो की

माझे नांव – जबन जीबलराव धानकुले
वय – अंदाजे ६४ वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त
राहणार – कन्हान

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जी.ओ. वर्मा यांच्या कडून –**

दिनांक १६/१२/२०१५ रोजी मी वरिष्ठ लिपीक म्हणून नगर परिषद कामठी येथे कार्यरत होतो. त्यावेळी रविंद्र पांढरे हे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते. माझ्या समक्ष पोलीसांनी कागदपत्र जप्त केले होते. ते कागदपत्र मुख्याधिकारी यांनी प्रमाणित करून दिले होते. मी पंच होतो. मला आता जप्त केलेले सर्व कागदपत्रे दाखविली. ते तेच आहेत. त्यामध्ये कार्याआदेश, अंदाजपत्रक, असे इतर कागदपत्रे आहेत. मला दाखविलेल्या कागदपत्रामध्ये मेंजरमेंट बुकच्या प्रती दिसून येत नाही. कागदपत्रे जप्त करतेवेळी पंचनामा करण्यात आला होता. मला आता तो पंचनामा दाखविला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्या पंचनाम्यास **निशाणी ७९** देण्यात येते.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपी क्र.१, २ व ४ व ५ तर्फे वकील श्री. अढाऊ यांचा पुकारा केला असता ते गैरहजर. आरोपी क्र.१ व ४ यांनी उलटतपास घेण्यास नकार दिला. सबब आरोपी क्र.१, २ व ४ व ५ तर्फे उलटतपास नाही**.

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री कांबळे यांच्या मार्फत सुरू**

हे म्हणणे खरे नाही की पंचनामा लिहतेवेळी मी हजर नव्हतो. पंचनामा संध्याकाळी ५.३० वाजता संपला. हे म्हणणे खरे नाही की माझ्या समक्ष कोणताही पंचनामा बनविण्यात आला नाही.

**उलटतपास संपला**.

**फेरतपासणी नाही**.

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

**स्वाक्षरी/–**
( मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी

कामठी
दिनांक २०/०८/२०२४